# जाहिरात प्रारुप

## राष्ट्रीय आरोग्य अभियान, यवतमाळ

## जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय यवतमाळ

### कंत्राटी पदाकरीता थेट मुलाखती (Walk-In-Interview)

राष्ट्रीय आरोग्य अभियान यवतमाळ अंतर्गत आयपीएचएस कार्यक्रमा अंतर्गत कंत्राटी विशेषज्ञ तालुका स्तरावर खालील कंत्राटी पदे **Walk In Interview** दिनांक २९/१०/२०२१ रोजी घेण्यात येणार आहे. करीता इच्छुक उमेदवारांनी सोबत जोडलेल्या अर्ज नमुन्यानुसार आवश्यक शैक्षणीक कागदपत्रांसह खालील वेळापत्रानुसार कार्यालयीन वेळेत अर्ज सादर करावा.

**रिक्त पदाचा तपशील पुढील प्रमाणे आहे**

| अ. क्र. | पदनाम | शैक्षणिक अहर्ता | एकुण रिक्त पदे | प्रवर्ग | वयोमर्यादा | एकत्रित मासिक मानधन | रिक्त पदांचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | स्त्रीरोग तज्ञ | MBBS MD/MS (Obst & Gyne) & MBBS DGO | १ | खुला | वयोमर्यादा ७० वर्ष राहील. | Rs. 75,000/- Full Time | RH Wani |
| २ | भुल तज्ञ | MD Anesthesia/DA/DNB | १ | खुला | वयोमर्यादा ७० वर्ष राहील. | Rs. 75,000/- Full Time | RH Wani |
| Total Post | | | २ | | | | |

सविस्तर जाहिरात अटी व शर्तीसह www.zpyavatmalgov.in व www.yavatmal.nic.in वर उपलब्ध आहे.

**आवश्यक कागदपत्रे :-** खालील कागदपत्रांची मुळ प्रतीची छायांकित प्रत स्वसाक्षांकीत करुन अर्जासोबत सादर करणे अनिवार्य राहील.

१) पदवि/पदविका प्रमाणपत्रे २) गुणपत्रिका (सर्व) ३) शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे,
४) संगणक अहर्तचे प्रमाणपत्र ५) जातीचे प्रमाणपत्रे ६) शाळा सोडल्याचा दाखला/जन्मतारखेचा दाखला
७) प्रमाणित केलेले अनुभव प्रमाणपत्रे ८) पासपोर्ट आकाराचा फोटो,

| अ.क्र | मुलाखतीचा कार्यकाळ | दिनांक | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | अर्ज व कागदपत्र सादर | २९/१०/२०२१ | सकाळी. १० ते दुपारी १.०० | जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय यवतमाळ |
| २ | मुलाखती करिता पात्र / अपात्र यादी | | दुपारी ३.०० वा | |
| ३ | मुलाखत | | दुपारी ४.०० वा | मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. यवतमाळ |

**टिप:-** तसेच या दिवसी उपलब्ध न झाल्यास विशेषतज्ञ या पदाकरीता दर महीन्याच्या पहिल्या मंगळवारी प्रत्यक्ष मुलाखत ठेवली जाईल. जर त्या दिवशी शासकीय सुट्टी असल्यास दुसऱ्या दिवशी प्रत्यक्ष मुलाखत घेण्यात येईल.

**अटी व शर्ती :-**

१) वरील पदे ही पुर्णपणे कंत्राटी स्वरुपाची असुन त्यांचा कालावधी दि.३१.०३.२०२२ पर्यंत मर्यादीत आहे. हा कालावधी वाढविला जाण्याची शक्यता आहे परंतु सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही. तसेच या पदासाठी शासनाचे सेवा नियम लागु नाहीत.

२) ही पदे राज्य शासनाची नियमित पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पदे आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही. तसेच अर्जदाराला शासकीय नियमित सेवेत सामावुन घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

Scanned by CamScanner

३) अर्जदार हा सबंधीत पदासाठी शारीरीक व मानसिकदृष्टया सक्षम असावा, अर्जदाराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

४) उपरोक्त सर्व पदासाठीचे वेतन हे एकत्रित मानधन आहे.

५) सदर रिक्त पदांच्या संख्येत, ठिकाण व मानधनात बदल होवु शकतो.

६) अनुभवी व उच्च शैक्षणिक अर्हता धारकांस प्राधान्य दिले जाईल.

७) उपरोक्त पदाकरीता निवड प्रक्रिया ही थेट मुलाखतीव्दारे घेण्यात येत असल्यामुळे जाहीरातीमधिल नमुद दिनांकास विहीत कालावधीत सोबत दिलेल्या अर्ज नमुन्यात मुळ शैक्षणिक कागदपत्राच्या सत्यप्रतीसह या कार्यालयात अर्ज सादर करावा, त्यानंतर प्राप्त होणारे अर्ज स्विकारल्या जाणार नाहीत.

८) सदर पदे राजस्तवरुन वार्षीक कृती आराखडा (पिआयपी) मध्ये पदे नामंजुर झाल्यास सदर पदे रदद करण्यात येईल.

९) अर्जदाराला सोईनुसार ठिकाण बदलवुन मिळण्याची मागणी करता येणार नाही.

१०) उपरोक्त सबंधीत पदाकरीता तत्सम कॉन्सीलकडुन रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे. अन्यथा उमेदवारांस मुलाखतीस अपात्र ठरवल्या जाईल.

११) भरती प्रक्रिया स्थगिती देणे/रदद करणे/पद संख्या कमी जास्त करणे/ पदभरती प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर राखीव ठेवण्यात आलेले आहेत. याबाबत कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही.

१२) मुलाखतीकरीता उपस्थित उमेदवारांना प्रवासभत्ता अथवा इतर कुठलाही भत्ता देय राहणार नाही.

१३) जाहिरातीमध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या पदाकरीता नोंदणी केलेल्या उमेदवारांची संख्या विचारात घेवुन मुलाखतीकरीता १:५ **Cut-Off** खालील प्रमाणे लावण्यात येईल.

**अ)** शैक्षणिक अंतीम वर्षाचे गुणांच्या ८०%

**ब)** पदवीत्तर पदवी असल्सास १० गुण व पदवीत्तर पदवीका असल्यास ०५ गुण अतिरिक्त देण्यात येतील परंतु **अ व ब ची** एकत्रीत बेरीज ८०% पेक्षा जास्त असणार नाही.

**क)** उमेदवारास शासकिय,निमशासकिय व राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत दोन वर्षपेक्षा कमी अनुभव असल्यास शुन्य गुण,दोन वर्ष अनुभव असल्यास ०५ गुण व पुढील प्रत्येक वर्षासाठी जास्तीत जास्त १० गुण देण्यात येतील.

**ड)** विषय ज्ञानासाठी, **Skill Assessment Protocol** व मुलाखत या करीता १० गुण असे मिळुन एकुण १०० गुण देण्यात येतील.

१४) शासकिय सेवानिवृत्त अधिकारी यांचेकरीता वयोमर्यादा ६२ वर्षे असेल. तसेच अनुभवास प्राधान्य असेल. वर्ग-३ व वर्ग-४ च्या पदावरुन निवृत्त झालेले कर्मचारी कंत्राटी पदावर अर्ज करण्यासाठी दि.१७.१२.२०१६ रोजीच्या शासननिर्णयाव्दारे अपात्र आहेत.

१५) सेवानिवृत्त उमेदवारांना मानधन शासननिर्णय क्र.: सकिंर्ण- २७१५/प्र.क्र./१००/१३ दि.१७.१२.२०१६ नुसार अदा करण्यात येईल.

१६) सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांचे विरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कार्यवाही चालु किंवा प्रस्तावित नसावी किंवा कोणत्याही प्रकारे फौजदारी प्रकरण नसावे.

१७) **विशेषज्ञ आणि अतिविशिष्ठ विशेषज्ञ यांना ७० वर्ष राहील तसेच रुजू होणे पुर्वी वैद्यकिय तपासणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.**

१८) **मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांसाठी रु. १००/- व खुल्या प्रवर्गातील रु. १५०/- चे जिल्हा एकत्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटीचे यवतमाळ यांच्या नावे डि.डि. स्वरुपात जोडण्यात यावे.**

जिल्हा शल्य चिकित्सक
सामान्य रुग्णालय, यतवमाळ

जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद, यवतमाळ

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, यवतमाळ

Scanned by CamScanner

## जिल्हा संकेतस्थळावर माहिती अपलोड करणेसाठीचा अर्ज

**(http://yavatmal.gov.in)**

**जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ**

---

दिनांक: ८.१०.२१

विभाग / कार्यालयाचे नाव :- जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय यवतमाळ

माहितीचा प्रकार :- सुचना ☐ निविदा ☐ भरती ☑ अन्य ☐ (योग्य प्रकारावर ✓ करा)

अन्य असल्यास :- ____________________

संकेतस्थळावरील लिंक (शीर्षक) :-

मराठी विशेषज्ञ वैद्यकिय अधिकारी

English: ____________________

प्रसिद्ध करण्याचा कालावधी :

तारखेपासून 20/10/2021 तारखेपर्यंत 31/10/2021

कार्यालय प्रमुखाची माहिती :

नाव आणि पदनाम डॉ. एस. एस. वारे

लँडलाईन दूरध्वनी क्र. __________ भ्रमणध्वनी क्र. __________

ई-मेल आय-डी ____________________

माहितीचे सॉफ्ट कॉपी माध्यम :-

सी.डी. ☐ पेन-ड्राइव्ह ☐ ई-मेल ☑ (योग्य प्रकारावर ✓ करा)

### माहिती अपलोड करणेबाबत प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, जिल्हा संकेतस्थळावर अपलोड करण्यासाठी पुरविलेली माहिती या कार्यालयाने सत्यापित केली आहे तसेच मा.तं. अधिनियम 2000 आणि आधार कायदा 2016 (क्रमांक 10(36) / 2015 – EG–II (Vol -V) दिनांक २५/३/२०१७ माहिती तंत्रज्ञान व दूरसंचार विभाग, भारत सरकार) अंतर्गत ती योग्य आहे करिता http://yavatmal.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देणे योग्य राहील.

स्वाक्षरी

कार्यालय प्रमुखाची सही व शिक्का

---

**कार्यालयीन उपयोगासाठी :-**

संबंधित विभागाकडील माहितीच्या अधिकृत व अचूकतेच्या प्रमाणपत्रानुसार, सदर माहिती जिल्ह्याच्या (http://yavatmal.gov.in) संकेतस्थळावर उपलब्ध केली जाऊ शकते.

जिल्हा संकेतस्थळ व्यवस्थापक,
जिल्हाधिकारी कार्यालय यवतमाळ

---

Scanned by CamScanner

महाराष्ट्र शासन आरोग्य सेवा
सामान्य रुग्णालय यवतमाळ

E-Mail Ads:- csyavatmal@gmail.com

आरोग्य सेवा

जा.क्र./जिशचिय/सारुय/ १४०३२ /२१
कार्यालय, जिल्हा शल्य चिकित्सक
सामान्य रुग्णालय, यवतमाळ
दिनांक :- १८/१०/२०२१

प्रति,
जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी
राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्र (एनआरसी)
जिल्हाधिकारी कार्यालय यवतमाळ

विषय :- राष्ट्रीय आरोग्य अभियांन अंतर्गत
जाहिरात प्रसिध्द करण्याबाबत....

उपरोक्त विषयान्वये आपणास सनिय सादर करण्यात येते की, कंत्राटी विशेषज्ञ पद भरण्यासंबंधीत जाहिरात yavatmal.nic.in या वेबसाईट वर प्रसिध्द करण्यात यावे.

(डॉ.टि.एम.वारे)
जिल्हा शल्य चिकित्सक
सामान्य रुग्णालय, यवतमाळ

प्रत :-
१. मा.जिल्हाधिकारी, यवतमाळ
२. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ

Scanned by CamScanner